# प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०१७ – १८

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिदिन

लोकमत

# कर्मयोगी व्यक्तिमत्त्व साहेबराव बुट्टे-पाटील



खेड तालुक्यातील जनतेचे श्रद्धास्थान, कर्मयोगी, एक ऋषितुल्य व्यक्ती, खेडचे माजी आमदार, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष स्व. साहेबरावजी बुट्टे-पाटील यांच्या स्मृतीस केलेले अभिवादन.

स्मरण

ॲड. सौ. राजमाला बुट्टे पाटील

३ जानेवारी २००१ रोजी पप्पा अचानक गेले. आजही पप्पांच्या आठवणीत शिरलं की वादळात हेलपाटणाऱ्या शुष्क पर्णाप्रमाणे मन दिशाहीन भरकटायला लागतं. असंख्य आठवणी, विचार मनाला घायाळ करत राहतात. आमचे पप्पा... खेड तालुक्यातील जनतेचे श्रद्धास्थान, कर्मयोगी, एक ऋषितुल्य व्यक्ती, खेडचे माजी आमदार, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष आणि माझे सासरे, आमचे सर्वांचे दैवत, स्व. साहेबरावजी बुट्टे-पाटील.

४ डिसेंबरला हॉस्पिटलमध्ये चालत गेलेले पप्पा ३ जानेवारीला घरात आले ते या त्यांच्या प्राणाहून प्रिय असलेल्या माझ्या भूमीत चिरनिद्रा घेण्यासाठी. १ जानेवारीला रात्री मी मुंबईहून आले आणि ३ जानेवारीला ती भयाण रात्र चिरत पपा गेल्याची बातमी आली. ३ तारखेला पहाटेच्या वेदनेने निस्तेज झालेला सूर्य उगवला तोच खेडचा, नीतिमत्तेचा, तत्त्वांचा, मूल्यांचा, तेजस्वी सूर्य अस्ताला गेला. हे सांगतच २ जानेवारीला अचानक राजगुरुनगरची सर्व दूरध्वनी यंत्रणा कोसळली. पहाटे ४ वाजता खेड पोलीस स्थानकात तत्कालीन शिक्षणमंत्री आ. दिलीपरावजी वळसे पाटील साहेबांनी निरोप दिला आणि ते भयाण सत्य पोलिसांनी घरी मला येऊन सांगितलं. त्यानंतर विमनस्क अवस्थेत पुणे आकाशवाणी केंद्रावर 'खेडचे मा. आमदार साहेबरावजी बुट्टे पाटील यांचे अल्पशा आजाराने मुंबईत निधन' ही बातमी जाणिवा आणि अश्रू गोठवून गेली. त्या दिवशी खेडमध्ये दीनदुबळ्यांचा कैवारी, अनाथांचे दैवत, खेडचे साहेब गेले; पण आमचे पप्पा गेले. आमचा आधारवड कोसळला. जगासाठी पप्पा एक विलक्षण व्यक्ती, कर्मयोगी, एक असामान्य व्यक्तिमत्त्व होतं; पण आमच्यासाठी मात्र जगाचे, आयुष्याचे, वास्तवाचे चटके आम्हाला बसू नयेत म्हणून स्वत: आभाळाप्रमाणे मायेची पखरण करणारे पप्पा होते.

पप्पांचे वडील कै. विठ्ठलराव हे भागवत धर्माची पताका खांद्यावर घेत पायी पंढरीची वारी करणारे वैष्णव; पण आपल्या भगीरथ प्रयत्नांनी ज्ञानगंगा आणणारे, खेड तालुक्यातील भीमेवर चासकमान धरणाने गोरगरीब शेतकऱ्यांसाठी समृद्धीची पंढरी निर्माण करणारे पप्पा होते. गीता, ज्ञानेश्वरीचे ते गाढे अभ्यासक होते, तर त्यातील तत्त्वे, मूल्ये त्यांनी जीवनात अंगीकारली होती. आयुष्यातही प्रत्येक दु:खाला सुखाइतकेच संयमाने तोंड देणाऱ्या पप्पांनी आयुष्यातील संकटांची वादळेही तेवढीच समर्थपणे पेलली. खडतर प्रतिकूल परिस्थितीवर मात करून घेतलेल्या शिक्षणानंतर वैराग्याची कफनी बांधून केलेले राजकारण अन् अवघाची संसार सुखाचा करता करता त्यांची संसाराची झालेली परवड त्यांनी संयमाने स्वीकारली. लोकोत्तर योग्यता व गुणवत्ता असतानाही, तडजोडीच्या वाटेने चालणारे नीतिमत्तेचा आणि तत्त्वांचा ऱ्हास करून केवळ स्वत:च्या उत्कर्षाच्या राजकारणाचा हव्यास त्यांनी कधी केला नाही. ३० डिसेंबरला पप्पांच्या स्वादुपिंडाची शस्त्रक्रिया करण्याचे निश्चित करण्यात आले. डॉक्टर आणि त्यांचे सहकारी त्यांना 'शस्त्रक्रिया करणे किती गरजेचे आहे, त्यातून तुम्ही बरे व्हाल,' हे समजावून सांगत होते. पप्पा मला म्हणाले, 'शस्त्रक्रिया करावीच लागणार आहे ना? ठीक आहे! पण तुम्ही डॉक्टरांना सांगा, शस्त्रक्रियेआधी मला एकदा माझा माथा त्या भूमीला लावून येऊ द्या! मी एकदा जाऊन येतो. मग हवं ते करा. मला एक दिवस जाण्याची परवानगी द्या!' पप्पांचा हट्ट मी डॉक्टरांना सांगितला तसे ते आश्चर्यचकित झाले. मला म्हणाले, 'छे! छे! आयसीयूमधला पेशंट असा मी पाठवू शकत नाही. त्यापेक्षा तुम्हीच त्यांना कोणाला भेटायचं त्यांना इथं बोलावून घ्या!' मी निराशेनं मान हलवली. डॉ. साहेब ९०,००० त्यांचं गणगोत, हुतात्म्यांची पवित्र भूमी आणि गंगेच्या पाण्यानंही ज्या पाण्याची तृष्णा भागायची नाही, ते पाणी इथं कुठून आणू मी! डॉक्टरांच्या नकारानं दु:खी झालेल्या पप्पांना मी म्हटलं, 'पप्पा, हे काय हो? आम्ही सर्वजण तुमच्यासाठी इथे; पण तुमचं प्रेम मात्र खेडच्या लोकांवरच?'. तसे पप्पा भरल्या डोळ्यांनी म्हणाले, 'सूनबाई, ही नाती या शरीराची; पण माझा आत्मा तिथे राहतो.' त्यानंतर पप्पांनी बोलणेच कमी केले आणि नंतर शांत झाले. पप्पा गेल्यानंतर खेडच्या चोहोदिशेने उसळलेला जनसागर, त्यांचे अखंड वाहणारे अश्रू, पप्पांच्या व्यथेत अन्नपाणी त्याग करणारे सामान्य लोक, अश्रूंवाटे वाहणाऱ्या नि:शब्द भावना, श्रद्धा बघितली आणि हे नातं मला उमजलं. जाता-जाता पप्पा लाखाचं गणगोत देऊन गेले... पप्पांनंतर आम्हीही हे प्रेम, हे ऋणानुबंध, ही जोडलेली नाळ जिवाच्या मोलानं जपली! पप्पा गेल्यानंतर २ वर्षांतच १० फेब्रुवारीला लोकाग्रहाने त्यांचा पुतळा महाविद्यालयाच्या प्रांगणात उभारण्यात आला! 'पराधिन आहे जगती पुत्र मानवाचा...' ज्या हातांनी त्यांच्या एकसष्टीच्या कौतुक, गौरवसोहळ्याची तयारी केली होती, तेच हात एक महिन्याने त्यांच्या अंत्ययात्रेची तयारी करत होते आणि दोन वर्षांनंतर त्यांच्या पुतळ्याच्या अनावरणाची भावपूर्ण श्रद्धांजली देणार होते. जनसमुदायही तोच आणि तेच पाहुणेही. आ. पवारसाहेब, मा. छगन भुजबळसाहेब आणि इतर अनेक मान्यवर त्या कार्यक्रमात होते. पवारसाहेब म्हणाले, 'माझ्या जीवनात असलेले अनेक मित्र हा माझा अनमोल ठेवा आहे आणि त्यातल्या त्यात साहेबराव म्हणजे 'कोहिनूर हिरा!'

पप्पा, तुम्ही पेरलेला कॉलेजरूपी वृक्ष बहरला. आज येथे शिकलेले विद्यार्थी घराचा, खेडचाच नव्हे तर समाजाचा आधारस्तंभ आहेत. या अंधारात, तुमचा विचार आणि संस्कारांनी तेजाळलेले काजवे समाजासाठी आदर्शाच्या नव्या प्रकाशवाटा निर्माण करतील. कदाचित याचसाठी होता सारा अट्टहास! हे कॉलेज हेच पप्पांचे ज्ञानमंदिर. या महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थ्याला सांगावेसे वाटते, 'सूर्यकुलाचा दिव्य वारसा प्रिय पुत्रांनो तुम्हा मिळे!' हा वारसा तुम्ही जपा, पप्पांनी प्रज्वलित केलेला हा 'ज्ञानदीप' समाजातील भ्रष्ट अंधकाराचे पतन करण्यासाठी तुमच्या रूपाने सदैव तेवत राहो...

Pune Main
Page No. 6 Jan 07, 2018
Powered by: erelego.com

लोकमत पुणे, शनिवार, दि. ६ जानेवारी २०१८ ५

# बुट्टे-पाटील स्मृतिदिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष साहेबरावजी बुट्टे-पाटील यांच्या १७ व्या स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात सर्वधर्मीय प्रार्थना, ग्रंथ प्रदर्शन व विक्री, रक्तदान शिबिर, विज्ञान प्रदर्शन, सुपुष्प विठ्ठलाचा भित्तिपत्रक प्रकाशन, शरीर घटकरचना मापन, व्याख्यान आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी शैलजा बुट्टेपाटील, संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक एअर कमोडोर त्र्यंबक जोशी, डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, मुरलीधर खांडरे, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

या अभिवादन कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख व्याख्याता म्हणून बोलताना डॉ. अनिल खिंवसरा यांनी साहेबरावजी बुट्टेपाटील यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. राजकीय विचारधारेच्या पलीकडे जाऊन समाजकारणाचा ध्यास घेतलेले साहेबरावजी बुट्टेपाटील खऱ्या अर्थाने ज्ञानवंत, प्रज्ञावंत होते, असे गौरवोद्गार त्यांनी काढले. त्यांच्या शैक्षणिक कामगिरीमुळे ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात ज्ञानाचा प्रकाश पडल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी अमृता लोणारी व कन्हैद काळे या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

स्त्रीशिक्षणाची जननी क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून महिलांचा सन्मान करणारी आणि कोणत्याही जातीधर्माचा द्वेष न करता जातीय सलोखा कायम राखण्यासाठी व सर्वधर्मसमभावाची शिकवण अंगी बाळगण्यासाठी कटिबद्ध राहणारी शपथ उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना देण्यात आली. महाविद्यालयीन राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व ससून रक्तपेढी पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे १०५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यासाठी ससूनचे रक्तसंक्रमण अधिकारी डॉ. अनिल शेंडे, रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश थाळूंज आणि प्रा. ए. बी. कानवडे यांनी नियोजन केले.

---

पुणे जिल्हा उत्तर ११ पुढारी पुणे, रविवार ७ जानेवारी २०१८

# राजगुरुनगर महाविद्यालयात विविध उपक्रम

निमगाव दावडी : वार्ताहर

खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साहेबराव बुट्टेपाटील यांच्या १७व्या स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यामध्ये सर्वधर्मीय प्रार्थना, ग्रंथ प्रदर्शन व विक्री, रक्तदान शिबिर, विज्ञान प्रदर्शन, सुपुत्र विठ्ठलाचा भित्तिपत्रक प्रकाशन, शरीर घटक रचना मापन, व्याख्याने आदी विविध उपक्रमांचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते.

शैलजा बुट्टेपाटील, संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक त्र्यंबक जोशी, डॉ. अनिल खिंवसरा, बाळासाहेब



रक्तदान शिबिर कार्यक्रमप्रसंगी संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील व इतर.

सांडभोर, सुशील शिंगवी, मुरलीधर खांडरे, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, सर्व प्राध्यापक व विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

याप्रसंगी अमृता लोणारी व कन्हैद काळे या विद्यार्थ्यांनी आपली मनोगते व्यक्त केली. राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व ससून रक्तपेढी पुणे यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यात सुमारे १०५ जणांनी रक्तदान केले. यासाठी रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अनिल शेंडे, कार्यक्रम अधिकारी प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश थाळूंज, एनसीसी प्रमुख प्रा. ए. बी. कानवडे यांनी नियोजन केले.

विज्ञान शाखेच्या वतीने तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनात ८४ विज्ञान प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. ग्रंथालय विभाग, डायमंड प्रकाशन व [illegible] प्रकाशन पुणे यांच्या वतीने पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले. शारीरिक शिक्षण विभागाच्या वतीने सुमारे १२० विद्यार्थी व प्राध्यापकांचे शरीर घटक रचना मापन करण्यात आले. प्रा. विक्रम देशमुख, ग्रंथपाल प्रा. पूनम तापकीर, प्रा. प्रतिमा लोणारी यांनी परिश्रम घेतले.

उपप्राचार्य डॉ. संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. सोनिया खराडी [illegible] सादर केलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

सकाळ
पुणे, रविवार
७ जानेवारी २०१८
७


# साहेबराव बुट्टे पाटील स्मृतिदिनी राजगुरुनगरला उपक्रम

राजगुरुनगर, ता. ६ : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक-अध्यक्ष साहेबराव बुट्टे पाटील यांच्या १७व्या स्मृती दिनानिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

शैलजा बुट्टे पाटील, संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, मानद सचिव हरिभाऊ सांडभोर, संचालक गणेश जोशी, डॉ. अनिल खिवसरा, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, मुरलीधर खांगटे, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टे पाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे आदी उपस्थित होते.

डॉ. खिवसरा यांनी साहेबरावजी बुट्टे पाटील यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला. अमृता सोनवणे व कल्पेश काळे यांनी मनोगत व्यक्त केले.

राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना व ससून रक्तपेढी, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. यात सुमारे १०५ रक्तदात्यांनी रक्तदान केले. यासाठी 'ससून'चे रक्त संक्रमण अधिकारी डॉ. अनिल शेवडे, प्रा. मच्छिंद्र मुळूक, प्रा. योगेश वाडेकर आणि एनसीसी प्रमुख प्रा. ए. बी. कानवडे यांनी नियोजन केले.



राजगुरुनगर (ता. खेड) : साहेबराव बुट्टे पाटील स्मृती दिनानिमित्त त्यांच्या पुतळ्यासमोरील स्मृतिज्योतीला अभिवादन करताना संस्थेचे पदाधिकारी.

सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त सर्वधर्मसमभावाची शपथ विद्यार्थ्यांना देण्यात आली. विज्ञान शाखेतर्फे तालुकास्तरीय विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. यात ८४ विज्ञान प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले. यासाठी प्रा. विकास देशमुख व सर्व विज्ञान शाखेतील प्राध्यापकांनी प्रयत्न केले. महाविद्यालयातील ग्रंथालय विभाग, डायमंड प्रकाशन, पुणे व सागर प्रकाशन यांच्यातर्फे पुस्तक प्रदर्शन आयोजित करण्यात आले होते. यासाठी ग्रंथपाल प्रा. पूनम वायकोर यांनी प्रयत्न केले. शारीरिक शिक्षण विभागातर्फे सुमारे १२० विद्यार्थी व प्राध्यापकांचे शरीर घटक रचना मापन करण्यात आले. प्रा. प्रतिमा सोनवणे यांनी यासाठी प्रयत्न केले. सूत्रसंचालन डॉ. संजय शिंदे यांनी केले.

---

१५ जानेवारी २०१८

## साहेबरावजी बुट्टेपाटील स्मृतिदिनानिमित्त विविध उपक्रम

राजगुरुनगर, (वार्ताहर) : येथील खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष साहेबरावजी बुट्टेपाटील यांच्या १७व्या स्मृतिदिनानिमित्त हुतात्मा राजगुरु महाविद्यालयात सर्वधर्मीय प्रार्थना, ग्रंथ प्रदर्शन व विक्री, रक्तदान शिबीर, विज्ञान प्रदर्शन, सुपुत्र विद्यालयाचा भित्तिपत्रक प्रकाशन, शरीर घटक रचना मापन, व्याख्यान आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. यावेळी शैलजा बुट्टेपाटील, संस्थेचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील, उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, गणेश जोशी, डॉ. अनिल खिवसरा, बाळासाहेब सांडभोर, सुशील शिंगवी, मुरलीधर खांगटे, उमेश आगरकर, ॲड. राजमाला बुट्टेपाटील, प्राचार्य डॉ. एस. बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. एच. एम. जरे, प्रा. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. जी. जी. गायकवाड, प्रबंधक कैलास पाचारणे, सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक व विद्यार्थी उपस्थित होते.

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख